# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र-१३४/२०२५/ अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. आण्णासाहेब मोहिनीराज जाधव, रा.देशपांडे लेन, नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार, तहसील कार्यालय, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर | तहसिलदार, तहसील कार्यालय, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर |

सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दि. १६/०४/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "आयोगाने व्दितीय अपील क्र. १६५१/२०१९/अहमदनगर संदर्भात आयुक्त, नाशिक यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, नेवासा यांनी पूर्वीचीच चुकीची माहिती दिली. मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, नाशिक यांच्या दिनांक १/०२/२०२४ रोजीच्या आदेशाचा अवमान केला." असे नमूद करुन तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ (१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असुन तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १५/०१/२०१९ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

***"दि.२९/१२/२०१८ चे अप्पर जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. कुका/कक्ष/१०/३/२०१३/२०१८ च्या पत्रावरील कार्यवाहीबाबत माहिती."***

४) आयोगाने व्दितीय अपील क्र. १६५१/२०१९/अहमदनगर संदर्भात दि. २७/०६/२०२३ रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीअंती दि.०१/०२/२०२४ अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

***" विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत मागणी केलेली वस्तुनिष्ठ माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी व जी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण नमुद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे."***

५) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने व्दितीय अपील क्र.१६५१/२०१९/अहमदनगर संदर्भात दिनांक ०१/०२/२०२४ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच, प्रत्यक्ष सुनावणीवेळी तत्कालीन /विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून, सुनावणीपूर्वी तत्कालीन / विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी कोणताही अहवाल आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

६) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमुद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner-Vs-State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत थेट माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही.सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ पोट कलम (८) (क) (२) नुसार **प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, जि. अहिल्यानगर** यांना सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, जि. अहिल्यानगर यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दीतीय अपील क्र. १६५१/२०१९/अहमदनगर संदर्भात दिनांक ०१/०२/२०२४ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२. द्वितीय अपिल सुनावणीवेळी कार्यरत (दि. २७/०६/२०२३ रोजी कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी आयोगाने व्दितीय अपील क्र. १६५१/२०१९/अहमदनगर संदर्भात दिनांक ०१/०२/२०२४ अन्वये पारित केलेल्या आदेशास अनुसरुन कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या १५ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील याची नोंद घ्यावी.

३. वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. १३४/२०२५/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करून पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी.तसेच, आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करून अहवाल सादर करावा.

जावक क्र. ३२७८ दि. ०४/०५/२०२६

वरील तीनही प्रती मिळाल्या

4/5/26